## ✲ महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये -

१) भव्य व सुसज्ज इमारत
२) सुसंपन्न ग्रंथालय
३) उच्च विद्याविभूषित व अनुभवी प्राध्यापक
४) उज्वल निकालाची परंपरा
५) समृद्ध क्रीडा विभाग
६) राष्ट्रीय सेवा योजना (NSS)
७) राष्ट्रीय छात्र सेना (NCC)
८) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
९) विद्यार्थी विशेष मार्गदर्शन प्रकल्प
१०) कमवा व शिका योजना
११) इंग्रजी भाषा समृद्धीसाठी विषेश मार्गदर्शन
१२) मागासवर्गीय विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी शासकीय वसतिगृहाची सोय
१३) महाविद्यालयाचे स्वतंत्र वसतिगृह
१४) व्यवसाय मार्गदर्शन केंद्र
१५) व्यक्तिमत्व विकास प्रकल्प
१६) मागासलेल्या विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या सोयी व आर्थिक सवलती
१७) विद्यार्थी कल्याण मंडळ व वाड्:मय मंडळ
१८) प्रत्येक विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष
१९) विद्यार्थ्यांच्या कला- गुणांसाठी सांस्कृतिक विभाग
२०) सहल विभाग
२१) महाविद्यालयात गुणवत्ता सुधार प्रकल्प
२२) विद्यार्थ्यांसाठी साप्ताहिक युवा व्यासपीठ
२३) अद्ययावत कॉमर्स लॅब व लँग्वेज लॅब
२४) कॅन्टीन सुविधा
२५) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र

Navanath Printers, Ghodegaon_9657624773

Ambegaon Taluka Vidya Vikas Mandal
Ghodegaon, Tal. Ambegaon, Dist. Pune.

॥ एकमेका सहाय्य करू। अवघे धरू सुपंथ ॥

आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित

# बी. डी. काळे महाविद्यालय

घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे. फोन नं. ०२१३३ - २४४२८२

Website : www.bdkalecollege.in E-mail : bdkcollege_ghodegaon@rediffmail.com



# माहिती पत्रक



पुणे जिल्हा क्रीडा समितीचा महाविद्यालयास सन २०२२-२०२३ चा उत्कृष्ट
क्रीडा महाविद्यालय पुरस्कार स्वीकारताना शा.शि.संचालक प्रा. भाऊसाहेब थोरात



NCC कॅडेड सोबत महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन
ॲड. मुकुदराव काळे व ले. डॉ. बाळासाहेब गव्हाळे



रानभाज्या व रानफळे उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना
श्रीमती हिराबाई काळे व सोबत इतर मान्यवर



महाविद्यालयातील अद्ययावत बास्केटबॉल
ॲक्रेलिक सिंथेटिक मैदान



रसायनशास्त्र प्रयोगशाळेत विद्यार्थी प्रात्यक्षिक करताना



ग्रंथालयाची सुसज्ज इमारत

॥ विद्यार्थी परम् दैवतम् ॥

## ✻ विद्यार्थी मित्रहो ! खालील सूचना लक्षात ठेवा ✻

शिक्षण व सुसंस्कारासाठी अविरत प्रयत्न करणाऱ्या या महाविद्यालयात आपण प्रवेश घेत आहात. आपले मन:पूर्वक स्वागत ! महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या उज्वल भवितव्यासाठी पुढील सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

माहिती पत्रकातील माहिती व नियम महत्वाचे असून ते विद्यार्थी व पालक यांनी वाचून त्याप्रमाणे नोंद घ्यावी.

✻ माहिती पत्रकातील माहिती, सूचना व नियम याबाबतीत आवश्यक वाटल्यास ऐनवेळी बदल केला जाईल.
विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी लगेच सूचना फलकावर लावण्यात येईल.

✻ दिलेल्या नियमाव्यतिरिक्त वेळोवेळी केलेले नियम हे सर्व विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहतील.

✻ महाविद्यालयातील सूचना फलकावर वेळोवेळी सूचना लावल्या जातात. पाठ्यक्रमाव्यतिरिक्त परिसंवाद, वादविवाद, सांस्कृतिक कार्यक्रम, बैठे व मैदानी खेळ आणि इतर उपक्रमांमध्ये भाग घेऊन विद्यार्थ्यांनी आपला सर्वांगीण विकास करुन घ्यावा.

✻ विद्यार्थ्यांनी सूचना फलकावरील सूचना वेळोवेळी व काळजीपूर्वक वाचाव्यात.

✻ विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्षात ७५% हजेरी (उपस्थिती) असणे आवश्यक आहे. अन्यथा त्यास विद्यापीठाच्या परीक्षेस बसता येणार नाही.

✻ महाविद्यालयात येताना विद्यार्थ्याने सोबत ओळखपत्र आणणे आवश्यक आहे.

✻ एखाद्या विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार प्राचार्यांना आहे.

✻ महाविद्यालयातील मालमत्तेच्या सुरक्षिततेची काळजी घ्यावी.

✻ प्रकाशक ✻

**प्रो. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर** (M.A., M.Phil., Ph.D., Set)
प्रभारी प्राचार्य
बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव (पुणे)

॥ एकमेका सहाय्य करू। अवघे धरू सुपंथ ॥

## आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित

# बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव

## ता. आंबेगाव, जि. पुणे.

### * संस्थेचा इतिहास व उद्दिष्टये :-

आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ या संस्थेची स्थापना सन १९५४ साली एका मंदिरात कार्यान्वित झाली. थोर समाजसेवक महात्मा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिक्षण महर्षि कर्मवीर भाऊराव पाटील इ. च्या शैक्षणिक प्रेरणेच्या तत्वज्ञानातून ग्रामीण विभागाचा शैक्षणिक विकास करुन कायापालट करण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील मागास स्तरातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाच्या वटवृक्षाद्वारे, ज्ञान आणि संस्काराद्वारे संस्कारक्षम समाजरचना घडविण्यासाठी, शीलसंवर्धन, प्रामाणिकपणा, चारित्र्य, त्याग, संयम, सहनशीलता या उद्दिष्टपूर्तीसाठी शिक्षणाच्या ज्ञानगंगेची बहुजनसमाजासाठी नितांत गरज लक्षात घेऊन आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ या शिक्षण संस्थेची स्थापना झाली.

या संस्थेचे घोडेगाव येथे जनता विद्या मंदिर  हे माध्यमिक विद्यालय असून त्याच प्रमाणे साल येथे भागशाळा सुरु केलेली आहे. तसेच पिंपळगाव (घोडे) येथे जून १९९१ पासून मुक्ताई प्रशाला सुरु करण्यात आली आहे. सन १९८२ पासून कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्यात आले असून प्रथम वाणिज्य शाखा सुरु करण्यात आली आहे. सन १९८९ मध्ये याच कनिष्ठ महाविद्यालयात कला शाखा सुरु करण्यात आली व सन १९९४ पासून विज्ञान शाखा सुरु करण्यात आली आहे.

सन १९८९ मध्ये संस्थेने वाणिज्य महाविद्यालय सुरु केले आहे. तसेच जून १९९१ पासून महाविद्यालयात कला  विद्या शाखा सुरु केली आहे, संस्थेने काळाची गरज लक्षात घेऊन सन २००३ पासून इंग्लिश मिडीयम स्कूल सुरु केले आहे. सन २००४ पासून पदव्युत्तर शिक्षणासाठी एम.ए., एम.कॉम. चे वर्ग सुरु केले आहे. तसेच जून २००८ पासून बी.सी.ए. अभ्यासक्रम सुरु केला असून त्यास विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. शै. वर्ष २०१२-१३ पासून विज्ञानशाखा सुरु झाली आहे. या संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, सेक्रेटरी आणि संचालक मंडळ तसेच अन्य शिक्षणप्रेमी ग्रामस्थ, शिक्षक व शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी यांच्या प्रेरणेने ही संस्था दिवसेंदिवस प्रगतिपथावर वाटचाल करीत आहे. शैक्षणिक गुणवत्तेची वाढ करुन ज्ञानसंपन्न विद्यार्थी घडविणे हे संस्थेचे उद्दिष्ट  आहे.

### * महाविद्यालयाचा परिचय :-

भिमेची अग्नेय वाहिनी उपनदी समजली जाणाऱ्या घोडनदीच्या तिरावर घोडेगाव वसलेले आहे. तसेच घोडेगाव नगरीत राजा हरिश्चंद्राचे या परिसरातील एकमेव असे मंदिर आहे. अशा या पावन स्मृतितील परिसरात तसेच डोंगर रांगांच्या कुशीत वसलेल्या निसर्ग सृष्टीत महाविद्यालयाची वास्तू आहे. भिमाशंकर हे घोडेगाव पासून जवळ आहे. त्यामुळे या परिसराला महत्व प्राप्त झाले आहे. विशेष म्हणजे आंबेगाव तालुक्यातील बहुतांश भाग हा आदिवासी म्हणून ओळखला जातो. आंबेगाव तालुक्यातील शैक्षणिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे केंद्र म्हणून या महाविद्यालयाकडे पाहिले जाते. या महाविद्यालयाची स्थापना १९८९ मध्ये झाली असून या महाविद्यालयात येणारे बहुतांश विद्यार्थी आदिवासी समाजातील आहेत. महाविद्यालयात या  विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत.

### * महाविद्यालयाला मिळालेली विविध पारितोषिके :-

* **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या युनिटने उत्कृष्ट काम केल्याबद्दल सन २००६-२००७ चा पुरस्कार महाविद्यालयास दिला आहे.**
* **पुणे विद्यापीठाने महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण मंडळाच्या उपक्रमाची उत्कृष्टपणे अंमलबजावणी केल्यामुळे सन २०१२-२०१३ चा उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार महाविद्यालयास मिळाला आहे.**
* **आंबेगाव तालुका पत्रकार संघाचा उपक्रमशील महाविद्यालय म्हणून २०१७-१८ चा पुरस्कार मिळाला आहे.**
* **महाविद्यालयास सन २०१७-२०१८ मध्ये इंडियन रेडक्रॉस सोसायटी पुणे जिल्हा शाखेतर्फे बेस्ट युथ रेड क्रॉस युनिट पुरस्कार मिळाला आहे. महविद्यालयाच्या निकालाची परंपराही उज्वल आहे.**

* शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्विकृती परिषद (नॅक) बेंगलूर यांचेकडून महाविद्यालयाचे विविध निकषाच्या आधारे मूल्यांकन करण्यात आले आहे. सदर मूल्यांकनाचे आधारे नॅककडून महाविद्यालयास 'B+' दर्जा दिला आहे. नॅकने महाविद्यालयामध्ये उपलब्ध करुन दिलेल्या सुविधा व महाविद्यालयाने राबविलेले विविध उपक्रम आणि विद्यार्थ्यातील गुणवत्ता वाढविण्यासंदर्भातील केलेले प्रयत्न यासंदर्भात समाधान व्यक्त केले आहे.

* शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत पुणे जिल्हा क्रीडा विभागाचा उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय पुरस्कार महाविद्यालयास मिळाला आहे.

## * महाविद्यालयातील विविध विभाग :-

महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विभाग कार्यरत आहेत.

### १) ग्रंथालय :-

महाविद्यालयामध्ये स्वतंत्र व प्रशस्त ग्रंथालय आहे. त्यात क्रमिक पुस्तके व बहुविध प्रकारचे संदर्भग्रंथ आहेत. तसेच विविध विषयांशी संबधित अनेक नियतकालिके, वृतपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके आणि मासिके उपलब्ध आहेत. विविध परीक्षासांठी आवश्यक असलेले संदर्भग्रंथ उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना घरीही ठराविक मुदतीपर्यंत वाचण्यासाठी ग्रंथ देण्याची तरतुद केली आहे. ग्रंथालयात N-LIST सुविधाही उपलब्ध आहे.

### २) पुस्तक पेटी (Book Bank) :-

महाविद्यालयातील ग्रंथालयाला जोडूनच पुस्तक पेढीची सोय सर्व विद्यार्थ्यांना करून देण्यात आली आहे. ही सोय फक्त गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी असून नाममात्र मूल्य घेऊन क्रमिक पुस्तके वर्षभर अभ्यासास घरी दिली जातात. याचा लाभ बहुसंख्य विद्यार्थी घेत आहेत.

### ३) जिमखाना विभाग :-

निरनिराळ्या खेळाद्वारे विद्यार्थ्यांचा उत्साह व क्रीडा नैपुण्य वाढविण्याचा प्रयत्न जिमखाना विभागाकडून केला जातो. अनेक खेळांची, व्यायामांच्या साधनांची सोय महाविद्यालयाने केली आहे.

महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी विद्यापीठाच्या पुणे जिल्हा क्रीडा स्पर्धेत चांगली कामगिरी केली आहे. वार्षिक क्रीडा महोत्सव घेऊन विविध खेळांचे आयोजन केले जाते. वर्षाच्या शेवटी महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ घेऊन महाविद्यालयाची प्रतिष्ठा वाढविणाऱ्या गुणी खेळाडूंचे, विद्यार्थ्यांचे कौतुक केले केले जाते.

### ४) राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) :-

महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठ मान्यतेनुसार महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे युनिट स्थापन करण्यात आले आहे. बौध्दिक विकासाबरोबर शारीरिक श्रमाचे महत्व पटवून देणे हा या योजनेमागील मूळ उद्देश आहे. राष्ट्राच्या विकासास हातभार लावणारे कर्तव्यदक्ष नागरिक तयार करण्याचे काम या योजनेमार्फत केले जाते. विद्यार्थ्यातील नेतृत्व, वक्तृत्व, संभाषण इ. सुप्त कलागुणांना वाव देणारे खुले व्यासपीठ या योजनेद्वारे उपलब्ध होत आहे. महाविद्यालयात या योजनेचे दोन युनीट असून त्यामध्ये २०० विद्यार्थ्यांना दरवर्षी प्रवेश दिला जातो.

## ५) राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.) :-

शैक्षणिक वर्ष २००७-२००८ पासून महाविद्यालयास ५० विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय छात्र सेनेचे युनिट मंजूर झाले आहे. त्यास विद्यार्थ्यांचाही चांगला प्रतिसाद मिळाला आहे. या युनिटमुळे विद्यार्थ्यांची शारीरिक व मानसिक जडण-घडण होऊन त्यांच्या नेतृत्व गुणाचा विकास होतो. विद्यार्थ्यांना सैन्यदलात, पोलीस दलात व अन्य संरक्षण दलामध्ये भरती होण्यासाठी राष्ट्रीय छात्र सेनेचा चांगला उपयोग होतो. शै. वर्ष २०१२-१३ पासून मुलींसाठी एन.सी.सी. मध्ये ३३% जागा राखून ठेवल्या आहेत.

## ६) आजीवन अध्ययन व विस्तार :-

या विभागाच्या वतीने महाविद्यालयात विद्यार्थी व परिसरातील जनतेसाठी विविध विषयांवरील व्याख्याने, शिबिरे, मेळावे, चर्चासत्रे आयोजित केली जातात.

## ७) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :-

महाविद्यालयात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना नोकरीची (सर्व्हिस) संधी उपलब्ध व्हावी हा दृष्टिकोन पुढे ठेवून महाविद्यालयात खास स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्यात आले आहे. या केंद्रामार्फत केंद्रीय लोकसेवा आयोग (U.P.S.C.), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (M.P.S.C.), स्टाफ सिलेक्शन बोर्ड (S.S.B.), रेल्वे भरती मंडळ (R.R.B.), बँक भरती मंडळ (B.R.B.), व प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळे इ. स्पर्धात्मक परीक्षांची पूर्व तयारी करवून घेतली जाते. महाविद्यालयातील ग्रंथालयात वरील विविध स्पर्धात्मक परीक्षेसाठी आवश्यक असणारी सर्व साप्ताहिके, पाक्षिके, मासिके व पुस्तके उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. वरील सर्व स्पर्धा परीक्षांची पूर्व तयारी अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापकांकडून करवून घेतली जाते. या मार्गदर्शन केंद्रामुळेच महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांना नोकरी उपलब्ध झालेली आहे.

## ८) व्यवसाय मार्गदर्शन केंद्र :-

महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पुढे नोकरीचा प्रश्न भेडसावत आहे. यावर उपाय म्हणून महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना उद्योग व्यवसायाच्या संदर्भात मार्गदर्शन करणे ही काळाची गरज लक्षात घेऊन महाविद्यालयामध्ये उद्योग व्यवसाय मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आले आहे. यासाठी ग्रंथालयातही विविध उद्योग व्यवसायाच्या संदर्भात माहिती असलेली पुस्तके उपलब्ध करुन दिली जातात. यशस्वी उद्योजकांकडून विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले जाते.

## ९) व्यक्तिमत्व विकास प्रकल्प :-

महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी व्यक्तिमत्व विकास प्रकल्प सुरु करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, बौध्दिक सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इ. क्षेत्रातील गुणांचा विकास करण्याचे कार्य या प्रकल्पाद्वारे केले जाते. यासाठी अनेक क्षेत्रातील मान्यवरांची व्याख्याने आयोजित केली जातात.

## १०) विद्यार्थी विकास मंडळ :-

महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ स्थापन करण्यात आले आहे. हे मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थी विशेष मार्गदर्शन प्रकल्पही राबवीत आहे. या प्रकल्पांतर्गत वर्षभर विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांचे मार्गदर्शन तज्ज्ञ व्यक्तिंकडून केले जाते. या मंडळामार्फत विद्यार्थी विमा योजनाही राबविली जाते. राज्यात विविध ठिकाणी विविध स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना पाठवून संधी दिली जाते.

## १२) युवा व्यासपीठ :-

महाविद्यालयामध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये लेखन, वाचन या गुणांना संधी उपलब्ध करुन देण्यासाठी महाविद्यालयात युवा व्यासपीठ नावाचे साप्ताहिक चालविले जाते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना स्फूट लेख, काव्य, सामान्यज्ञान, विनोद, वात्रटिका, सुभाषिते, देशातील व राज्यातील चालू घडामोडी यांची माहिती विद्यार्थ्यांकडून घेऊन युवा व्यासपीठामध्ये प्रसिध्द केली जाते. याचा लाभ सर्व विद्यार्थ्यांना मिळत आहे.

## १३) विद्यार्थी उपहारगृह (कॅन्टीन) :-

महाविद्यालयामध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपहारगृहाची सोय करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना मधल्या सुट्टीत व तास नसेल तेव्हा विद्यार्थी उपहारगृहाचा लाभ घेत असतात.

## १४) कमवा व शिका योजना :-

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या '**स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद**' या घोषवाक्यास अनुसरुन घोडेगाव येथील बी.डी.काळे महाविद्यालयात सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून होतकरु व गरीब विद्यार्थ्यांसाठी कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना सुरु केलेली आहे. या योजनेनुसार महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांना कामे दिली जातात. सदर कामाचा मोबदला म्हणून तासाला रु. ४५/- इतकी रक्कम दिली जाते. या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे ही योजना घोडेगाव परिसरातील शिक्षणप्रेमी ग्रामस्थांच्या देणगीतून व विद्यापीठाच्या अनुदानातून चालविली जात आहे.

## १५) वाङ्.मय मंडळ :-

महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळवून देण्यासाठी हे मंडळ कार्यरत आहे. साप्ताहिक युवा व्यासपीठही या मंडळामार्फत चालविले जाते व देशातील थोर व्यक्तिंची पुण्यतिथी व जयंती साजरी केली जाते.

## १६) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र :

महाविद्यालयात नाशिक येथील य. च. म. मु. विद्यापीठाचे अभ्यास केंद्र जानेवारी २००३ पासून सुरु करण्यात आले आहे. या केंद्रामुळे महाविद्यालयाच्या परिसरातील दहावी - बारावी नापास झालेल्या विद्यार्थ्यांनाही प्रथम वर्ष बी. ए. / बी. कॉम. या वर्गात प्रवेश घेता येतो. तसेच जे विद्यार्थी बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर महाविद्यालयात येऊ शकत नाहीत अशा विद्यार्थ्यांना या अभ्यास केंद्रात प्रथम वर्ष बी. ए. / बी.कॉम. या वर्गात प्रवेश घेऊन घरी बसून उच्च शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या संदर्भात सविस्तर माहिती महाविद्यालयात उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

## १७) संगणक प्रयोग शाळा :-

महाविद्यालयामध्ये प्रशासकीय कामकाजासाठी तसेच विद्यार्थ्यांना इन्टरनेट, इमेल यांचे प्रशिक्षण देण्यासाठी १० संगणक असलेले अद्ययावत संगणक कक्ष महाविद्यालयामध्ये आहे. तसेच १८ संगणकांची अद्यायावत संगणक प्रयोगशाळाही आहे. महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या तसेच संगणक कोर्स केलेल्या विद्यार्थ्यांना सरावासाठी अल्प फी घेऊन संधी दिली जाते. संगणक कक्षासाठी स्वतंत्र अनुभवी शिक्षकाची नेमणूक केली आहे.

## १८) अद्ययावत कॉमर्स लॅब व लँग्वेज लॅब :-

महाविद्यालयात कॉमर्स विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना विषयाचे ज्ञान अधिक सखोल मिळावे, अध्यापन कामकाजामध्ये दृक्श्राव्य साधनाचा वापर करुन विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण देता यावे यासाठी अद्ययावत अशी कॉमर्स लॅब महाविद्यालयात आहे. तसेच विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान मिळावे म्हणून महाविद्यालयात लँग्वेजलॅबही सुरु केलेली आहे.

## १९) विद्यार्थिनींसाठी वसतिगृहाची सोय :-

महाविद्यालयामध्ये येणाऱ्या गरीब व होतकरु विद्यार्थिनीसाठी तसेच प्रवास खर्च न परवडल्यामुळे निवासी राहू इच्छिणाऱ्या विद्यार्थिनीसाठी महाविद्यालयाच्या परिसरात वसतिगृहाची सोय करण्यात आली आहे. सर्व सोयींनीयुक्त अशा वसतिगृहात राहू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्यावेळीच फॉर्म भरुन द्यावयाचा आहे. अल्पदरातच विद्यार्थिनींना निवासाची सोय करुन दिली जाणार आहे.

## महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी "करिअर कट्टा"

### करिअर कट्टामध्ये समाविष्ट उपक्रम

१) आय.ए.एस. आपल्या भेटीला
- राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षा, महाराष्ट्र लोकसेवा आयोग
- पोलीस भरती
- बँकिंग सेवा
- स्टाफ सिलेक्शन कमिशन
- केंद्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षा (यू.पी.एस.सी.)

२) उद्योजक आपल्या भेटीला
- उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास
- व्यवस्थापकीय कौशल्य व प्रत्यक्ष मार्गदर्शन
- वित्त व्यवस्थापन
- निर्णय क्षमता
- जोखीम व्यवस्थापन (Risk Management)
- मनुष्यबळ व साधन सामुग्री व्यवसस्थापन
- आधुनिक तंत्रज्ञान

३) भारतीय संविधानाचे पारायण
४) वृत्तवेध स्पर्धा परिक्षेच्या तयारीसाठी
५) सायबर सिक्युरिटी
6) Model कौशल्य विकास केंद्र
७) उद्योजकता विकास केंद्र

**ध्येयपूर्तीच्या वाटेवर सातत्याने ३६५ दिवस करिअर कट्टा**

## २०) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाच्या विविध योजना :-

### १) विशेष मार्गदर्शन योजना :-

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनात नवचैतन्य विकसित करण्यासाठी विद्यापीठाने विशेष मार्गदर्शन योजना सुरु केली आहे. ही योजना महाविद्यालयात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींकरीतां आहे. या योजनेनुसार आर्थिक दृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना कोणतेही शुल्क न आकारता विशेष मार्गदर्शन केले जाते. या योजनेसाठी विद्यापीठाकडून सदर शैक्षणिक वर्षात महाविद्यालयास विद्यापीठाकडून रु. ९,०००/- इतके अनुदान दिले जाते.

### २) विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास योजना :-

महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींना, शिक्षणेतर उपक्रमात मोकळेपणा ने सहभागी होता यावे व त्यातून त्यांना स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास साधता यावा या भूमिकेतून विद्यापीठाने ही योजना सुरु केली आहे. विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, शिक्षणाबरोबरच जीवनमूल्य रुजविणे, विद्यार्थिनींना सक्षम बनविणे, आरोग्य, महिलांविषयी कायदे, संस्कृती इ. विषयी मार्गदर्शन करणे, इत्यादी हेतू पुढे ठेवून विद्यापीठाने ही योजना सुरु केली आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी विद्यापीठाकडून रु. ५०००/- इतके अनुदान मंजूर केले जाते.

### ३) निर्भयकन्या अभियान :-

महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या मुली मानसिकदृष्ट्या स्वावलंबी व्हाव्यात, शिक्षणाबरोबरच स्वतःच्या सबलतेची जाणीव त्यांना व्हावी अशा उपक्रमातून मुलींना आपल्या सामर्थ्याची ओळख व्हावी, निर्भय, निरामय आणि स्वच्छ व सुंदर वातावरणात मुलींनी स्वातंत्र्याचा उपभोग घेऊन स्वतःच्या जीवनाला उत्तम आकार द्यावा यासाठी विद्यापीठाने निर्भयकन्या अभियान ही योजना सुरु केली आहे.

या योजनेनुसार ८ ते १० महाविद्यालयांचा गट तयार करुन एकत्रित प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले जाते. या योजनेर्तंगत विशेष शिबिरासाठी विद्यापीठातर्फे महाविद्यालयास रु. ५०००/- इतके अनुदान दिले जाते.

### ४) विद्यार्थी सुरक्षा विमा योजना :-

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळा मार्फत महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी 'विद्यार्थी सुरक्षा विमा योजना' शैक्षणिक वर्ष १९९२-९३ पासून सुरु केली आहे. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयात दरवर्षी प्रवेश घेताना रु. २०/- सुरक्षा विमा निधी भरणे आवश्यक आहे. या योजनेर्तंगत अपघाती मृत्यू , नुकसान भरपाई किंवा अपघातात जखमी झाल्यानंतर ही नुकसान भरपाई मिळते. विद्यार्थ्यांनी किंवा त्यांच्या पालकांनी आवश्यकतेनुसार महाविद्यालयाशी संपर्क करुन आवश्यक कागद पत्रांची पूर्तता करावयाची आहे.

## ५) माजी कुलपती डॉ. पी.सी. अलेक्झांडर आंतरविद्यापीठ वक्तृत्व स्पर्धा :-

पुणे विद्यापीठाच्या वतीने माजी कुलपती डॉ. पी.सी. अलेक्झांडर वक्तृत्व स्पर्धेचे दरवर्षी आयोजन केले जाते. सदर वक्तृत्व स्पर्धा मराठी व इंग्रजी भाषेतच दोन टप्प्यांमध्ये संपन्न होते. पहिल्या टप्प्यामध्ये मराठी आणि इंग्रजी भाषेतील वक्तृत्व स्पर्धेची उपांत्यफेरी सा.फु. पुणे विद्यापीठाच्यावतीने आयोजित करण्यात येते. 'मराठी' भाषेतील वक्तृत्व स्पर्धेच्या अंतीम फेरीचे आयोजन पुणे विद्यापीठात करण्यात येते. 'इंग्रजी' भाषेतील वक्तृत्व स्पर्धेच्या अंतिम फेरीचे आयोजन मुंबई विद्यापीठातर्फे मुंबई येथे करण्यात येते.

## ६) युवक महोत्सव :-

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा सांस्कृतिक क्षेत्रात लौकिक वृध्दिंगत व्हावा याकरीतां विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाद्वारे सर्व सलग्न महाविद्यालयामधील तसेच विद्यापीठ पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरीत केले जाते. विविध सांस्कृतिक कला प्रकारांमध्ये उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विद्यापीठ संघामध्ये समावेश करुन त्यांना राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होण्याकरीता पाठविण्यात येते.

### अ) राज्यस्तरीय युवक महोत्सव :-

राज्यस्तरावर दरवर्षी '**इंद्रधनुष्य**' या आंतरविद्यापीठीय युवक महोत्सवाचे आयोजन केले जाते. सदर महोत्सवामध्ये महाराष्ट्रातील सर्व कृषी व अकृषी विद्यापीठांना सहभागी होता येते. या स्पर्धांचे ठिकाण व वेळापत्रक यासंबंधीचे परिपत्रक विद्यापीठाला प्राप्त झाल्यानंतर ते महाविद्यालयांना कळविले जाते.

### ब) पश्चिम विभागीय युवक महोत्सव :-

अखिल भारतीय विद्यापीठ संघाद्वारे दरवर्षी विभागीय स्तरावर युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. संघाच्या मार्गदर्शक तत्वानुसार पूर्व व पश्चिम, दक्षिण व उत्तर असे चार विभाग राष्ट्रीय स्तरावर करण्यात आले आहेत. सा. फु. पुणे विद्यापीठाचा समावेश पश्चिम विभागामध्ये होत असल्यामुळे विद्यापीठाचे स्पर्धकांचा पश्चिम विभागीय युवक महोत्सवामध्ये समावेश करण्यात येतो. सदर युवक महोत्सव हा आंतरविद्यापीठ स्तरावरील असून पश्चिम भारतातील सर्व विद्यापीठांचे संघ स्पर्धेसाठी नियोजित ठिकाणी निमंत्रीत केले जातात. वरील दोन्ही स्तरांवरील युवक महोत्सवात महाविद्यालयातील युवकांनी सहभाग घ्यावा अशी विद्यापीठाची अपेक्षा आहे.

वरील प्रमाणे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला आकार देण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ विविध योजना राबवित आहे.

# * वरिष्ठ महाविद्यालय *

## * कला विद्याशाखा * (Arts Faculty)

| प्रथम वर्ष कला | द्वितीय वर्ष कला | तृतीय वर्ष कला |
|---|---|---|
| १) इंग्रजी (अनिवार्य) | १) इंग्रजी (अनिवार्य) | १) इंग्रजी (अनिवार्य) |
| २) इंग्रजी (ॲडीशनल) किंवा अर्थशास्त्र | २) मराठी (जनरल, स्पेशल विषय) | २) मराठी (जनरल, स्पेशल विषय) |
| ३) मराठी | ३) राज्यशास्त्र (जनरल, स्पेशल विषय) | ३) राज्यशास्त्र (जनरल, स्पेशल विषय) |
| ४) राज्यशास्त्र | ४) अर्थशास्त्र (जनरल, स्पेशल विषय) | ४) अर्थशास्त्र (जनरल, स्पेशल विषय) |
| ५) भूगोल | ५) इतिहास (जनरल, स्पेशल विषय) | ५) इतिहास (जनरल, स्पेशल विषय) |
| ६) इतिहास | ६) इंग्रजी (जनरल, स्पेशल विषय) | ६) इंग्रजी (जनरल, स्पेशल विषय) |
| ७) शा. शिक्षण | ७) भूगोल (जनरल) | ७) भूगोल (जनरल) |
| ८) लोकशाही, निवडणूका आणि सुशासन (सत्र दुसरे) | ८) पर्यावरण जाणीव जागृती (अनिवार्य) | ८) जेनेरिक इलेक्टीव्ह (अनिवार्य) |
| | ९) MIL - (अनिवार्य) | |

टिप :- १) एस. वाय. बी. ए. ला ज्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषय स्पेशल घ्यावयाचा असेल अशा विद्यार्थ्यांना एफ. वाय. बी. ए. ला ॲडिशनल इंग्रजी घेणे आवश्यक आहे.

२) एस. वाय. बी. ए. ला आवश्यक इंग्रजी, जनरल विषयाचे तीन आणि स्पेशल विषयाचे दोन असे एकूण सहा पेपर असतील.

३) फॉर्ममध्ये नमूद केलेला स्पेशल विषय बदलता येणार नाही. विचार करुन स्पेशल विषयाची निवड करावी.

४) प्रथम वर्ष/द्वितीय वर्ष कला, वाणिज्य, विज्ञान व बी.सी.ए.साठी शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून विद्यापीठाने CBCS पद्धती सुरु केली आहे.

## * वाणिज्य विद्याशाखा * (Commerce Faculty)

### * प्रथम वर्ष वाणिज्य (F.Y.B.Com.) सेमिस्टर १ व २

| | |
|---|---|
| 1. Compulsary English | कंपल्सरी इंग्लिश |
| 2. Financial Accounting | फिनान्शिअल अकौंटिग |
| 3. Business Economics (Micro) | व्यावसायिक अर्थशास्त्र (सूक्ष्म) |
| 4. Business Mathematics and Statistics | व्याव. अंकगणित आणि संख्याशास्त्र |
| 5. Org. Skill Development | संघटनात्मक कौशल्य विकास |
| 6. Marketing and Salesmanship | विपणन व विक्रयकला |
| 7. Marathi | मराठी |
| 8. Phy. Education | शा. शिक्षण |
| 9. Democracy, Election and Governance (Sem. II) | |

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासून F.Y.B.Com. च्या विद्यार्थ्यांना Value Added Courses सत्र १ व सत्र २ करिता सुरु करण्यात आले आहेत. ते विद्यापीठाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांना बंधनकारक आहेत. त्याची फी २००/- रुपये आहे.

### ✻ द्वितीय वर्ष वाणिज्य (S.Y.B.Com.) सेमिस्टर ३ व ४

1. Business Communication — व्यावसायिक संज्ञापन
2. Corporate Accounting — कार्पोरेट अकौंटिंग
3. Business Economics (Macro) — व्यावसायिक अर्थशास्त्र (स्थुल)
4. Business Management — व्यवसाय व्यवस्थापन
5. Elements of Company Law — कंपनी कायद्याची मूलतत्त्वे
6. Cost & Works Accounting-I or Business Entrepreneurship - I
   कॉस्ट अ‍ॅन्ड वर्क्स अकौन्टींग-१ किंवा व्यावसायिक उद्योजकता -१
7. Environmental Studies — पर्यावरण अभ्यास

### ✻ तृतीय वर्ष वाणिज्य (T.Y.B.Com.) सेमिस्टर ५ व ६

1. Business Regulatory Framework (M. Law) व्यवसाय विषयक कायदे
2. Advanced Accounting — अ‍ॅडव्हान्स्ड् अकौंटिंग
3. Indian & Global Economic Development — भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास
4. Auditing & Taxation — अंकेक्षण व करप्रणाली
5. Cost & Works Accounting Paper - II or Business Entrepreneurship - II
   कॉस्ट अ‍ॅन्ड वर्क अकौंटिंग पेपर - २ किंवा व्यावसायिक उद्योजकता -२
6. Cost & Works Accounting Paper - III or Business Entrepreneurship - III
   कॉस्ट अ‍ॅन्ड वर्क अकौंटिंग पेपर - ३ किंवा व्यावसायिक उद्योजकता -३

✻ व्यावसायिक उद्योजकता हा विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यास १०००/- रु. फी जास्त भरावी लागेल.

## ✻ विज्ञान विद्याशाखा ✻
## (Science Faculty)

**सेमि. १ व २**

### ✻ प्रथम वर्ष विज्ञान (F.Y. B.Sc.)

1. Botany — वनस्पतीशास्त्र
2. Chemistry — रसायनशास्त्र
3. Physics — भौतिकशास्त्र
4. Mathematics/गणित/ Zoology — प्राणीशास्त्र
5. Phy. Education शा.शिक्षण

**सेमि. ३ व ४**

### ✻ द्वितीय वर्ष विज्ञान (S.Y. B.Sc.)

1. Marathi — मराठी
2. Chemistry — रसायनशास्त्र
3. Botany / Physics — वनस्पतीशास्त्र/ भौतिकशास्त्र
4. Zoology/Mathematics — प्राणीशास्त्र / गणित
5. Environmental Studies
6. Credit Course
6. लोकशाही निवडणुका व सुशासन

### ✻ तृतीय वर्ष विज्ञान (T.Y. B.Sc.) - 1. Chemistry Spl. - रसायनशास्त्र विशेष स्तर

**सेमि. ५ व ६**

## M.Com. : I Part

### Semester - I

1. Management Accounting
2. Strategic Management
3. Advanced Accounting Spl - Paper I
4. Income Tax Spl-Paper - II
5. Human Rights
6. Information Security

## Semester - II

1. Financial Analysis & Control
2. Industrial Economics
3. Specialised Area in Accounting - Spl - Paper III
4. Business Taxation Assesment & Plan. - Spl - Paper IV
5. Human Rights - II
6. Information Security - II

# M.Com. : II Part

## Semester - III

1. Business Finance
2. Research Methodology for Business
3. Advanced Auditing Spl - Paper V
4. Specialised Auditing Spl - Paper VI
5. Introduction to Constitation
7. Information Security - III

## Semester - IV

1. Capital Market & Financial Service
2. Global Economics Enveronment
3. Recent Advances in Accounting Taxation & Auditing
   Spl - Paper VII
4. Project Work Spl. - Paper VIII
5. Information Security - IV
6. Skill Development - II

# M.A. Marathi

## एम. ए. - भाग - १

### Semester - I

१) Human Rights - I
२) Introduction to cyber security - I
३) भाषाव्यवहार आणि भाषिक कौशल्य भाग – १
४) मराठी साहित्याचा इतिहास (इ.स. १८१८ ते इ.स. १९२०)
५) ऐतिहासिक भाषाविज्ञान
६) वैकल्पिक विषय – ग्रामीण साहित्य

### Semester - II

१) Human Rights -II
२) Introduction to Cyber Security - II
३) भाषाव्यवहार आणि भाषिक कौशल्य भाग – २
४) मराठी साहित्याचा इतिहास (इ.स. १९२० ते इ.स. २०१०)
५) समाजभाषाविज्ञान
६) वैकल्पिक विषय – दलित साहित्य

## एम.ए. - भाग - २

### Semester III

१) Introduction to cyber Security - III
२) Skill Development - I
३) प्रसारमाध्यमांसाठी लेखन कौशल्ये भाग – १
४) साहित्य समीक्षा
५) नेमलेल्या अर्वाचीन साहित्य कृतींचा अभ्यास भाग – १
६) वैकल्पिक विषय – लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य भाग – १
७) राज्यघटनेची ओळख

### Semester IV

१) Indroduction to cyber Security -IV
2) Skill Development - II
३) प्रसारमाध्यमांसाठी लेखनकौशल्ये भाग – २
४) साहित्य संशोधन
५) नेमलेल्या अर्वाचीन साहित्यकृतींचा अभ्यास भाग – २
६) वैकल्पिक विषय – लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य भाग – २

# B.C.A./B.B.A. (C.A.)

## *BACHELOR OF BUSINESS ADMINISTRATION IN COMPUTER APPLICATION*

**Title :**

The Programme will be introduced as under BBA(CA) Part I w.e.f. the academic year 2020-2021. BBA (CA) II w.e.f. 2020-21. BCA Part III w.e.f. 2015-16. BCA is formally known as BBA (CA) as under w.e.f. the academic year 2015-2016.

**Eligibility :**

A candidate must have passed (a) HSC (10+2) from any stream with English as passing subject with minimum 40% marks in aggregate. 35% marks for SC/ST Students.

**Duration :**

The duration of the BCA/BBA (CA) degree programme shall be three years divided into Six Semesters.

**Objectives :**

The objectives of the Programme shall be to provide sound academic base from which an advanced career in computer application can be developed. Conceptual grounding in computer usage as well as its practical business application will be provided.

**The Scheme of Examination :**

The BCA/BBA (CA) Examination will be of 3600 marks divided into 2 Parts as per details given below :

1. BCA/BBA (CA) Part I (Sem. I, II) Aggregate marks 1200
2. BCA/BBA (CA) Part II ( Sem. III, IV) Aggregate marks 1200
3. BCA Part III ( Sem. V, VI) Aggregate marks 1200

For course in Practicals (Sem. I,II,III,IV,V) there will Practical Examination of 20 marks. For course on Project work there will be oral presentation consisting of 20 marks and written Report of 80 marks (Course Nos. 635, 636)

6. The candidates will be allowed to carry any number to backlog of course prescribed for BCA/BBA (CA) Part I, II, However a candidate shall not be admited to BCA Part III Exam. (Sem. V)

unless he passed in all courses at the BCA/BBA (CA)part 1.

7. Standard of passing and award of class: In order to pass in the examination a candidate has to obtain 40 marks out of 100 ( Sem-end Exam. 80+Class works marks 20 taken together.) The class will be awarded to the student on the basis of aggregate marks obtained by him for all the 3 years examinations taken together.

The award of class will be as follows:

| Aggregate Percentage of Marks | Class |
|---|---|
| 40 and above | Pass |
| 50 & above- less than 60 | Second Class |
| 60 & above- less than 70 | First Class |
| 70 & above | First Class with Dis tinction |

8. The medium of instruction and examination (written and viva ) shall be English.

9. The Semesterwise structure of the programme shall be as follows:

## F.Y.B.C.A./B.B.A .(C.A.)

### Semester I

1. Business Communication
2. Principles of Management
3. C language
4. Database Management System
5. Statistics
6. Computer Laboratary based on 103 & 104
7. Add on (PPA)

### Semester II

1. Organization Behaviour & HRM
2. Finacial Accounting
3. Business Mathematics
4. Relational Database
5. Web Technology HTML-JS-CSS
6. Computer Laboratary based on 204 & 205
7. Add on (Advance C)
8. Democracy, - Election and Governance

# S.Y.B.C.A./B.B.A. (C.A.)

## Semester III

1. Digital Marketing
2. Data Structure
3. Software Engineering
4. Angular JS or PHP
5. Big Data or Block Chain
6. Computer Laboratory
   Based on 302, 304 & 305
7. Environment Awarness

## Semester IV

1. Networking
2. Object Oriented Concept through CPP
3. Operating System
4. NODE JS or Advance PHP or Hadoop
5. Project
